## निवडणूक डोळ्यासमोर ठेवून रस्त्यांची डागडुजी !







# भावी जिल्हा परिषद सदस्यांचा संधीसाधूपणा उघड

## डांबर न वापरता रस्ताकाम; ग्रामस्थांनी काम पाडले बंद-डॉ.गणेश ढवळे

बीड । दिव्य वार्ता ।

ग्रामीण भागातील खड्डेमय रस्त्यांमुळे दुचाकीस्वार घसरून पडून अपघात होत असताना, नागरिकांचे जीव जात असताना आणि पावसाळ्यात शालेय विद्यार्थ्यांना चिखलातून वाट काढावी लागत असताना ग्रामस्थांनी दिलेली निवेदने, लेखी तक्रारी व आंदोलने संबंधित भावी जिल्हा परिषद सदस्यांनी सातत्याने दुर्लक्षित केली होती. मात्र आता जिल्हा परिषद निवडणूक जवळ येताच अचानक रस्त्यांची तात्पुरती डागडुजी सुरू झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

काही ठिकाणी खड्ड्यांवर माती टाकणे, खडी पसरवणे, नाममात्र डांबरीकरण करणे तर काही ठिकाणी स्वखर्चाने रस्ता केला असे गाजावाजा करत फोटो-व्हिडीओ सोशल मीडिया व स्थानिक वृत्तपत्रांत झळकू लागले आहेत. मात्र हा खरा विकास नसून निवडणूक डोळ्यासमोर ठेवून केलेली दिखाऊ मलमपट्टी असल्याचा घणाघाती आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केला आहे.

निवडणूक नसती तर हे रस्ते तसेच खड्डेमय राहिले असते. अपघातात माणसं गेली, अनेकजण जखमी झाले, तरी कुणालाही जाग आली नाही. आता मतांसाठी अचानक प्रेम उफाळून आले आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया डॉ. ढवळे यांनी दिली. ही डागडुजी तात्पुरती असून पावसाळा आला की परिस्थिती पुन्हा जैसे थे होणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला. केवळ निवडणूकपुरते नव्हे तर दीर्घकालीन, दर्जेदार व टिकाऊ रस्ते बांधकाम व्हावे, अशी ठाम मागणी त्यांनी केली आहे.

### महाजनवाडी ग्रामस्थांनी निकृष्ट रस्ताकाम अडवले

**बीड तालुक्यातील बालाघाटावरील चौसाळा जिल्हा परिषद सर्कल अंतर्गत राष्ट्रीय महामार्ग मांजरसुंभा-पाटोदा-महाजनवाडी-बोरखेड या रस्त्याच्या डागडुजीचे काम सुरू असून सुमारे १० लाख रुपये खर्चाचे अंदाजे ८०० मीटर खडी-डांबरीकरणाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. विशेष म्हणजे रस्त्याच्या कामात डांबरच न वापरता केवळ खडी टाकून काम केले जात असल्याचे निदर्शनास येताच संतप्त ग्रामस्थांनी रस्ताकाम तात्काळ बंद पाडले. यावेळी कंत्राटदाराने आपली चूक कबूल करत रस्त्यावरील खडी बाजूला काढून पुन्हा डांबर टाकून योग्य पद्धतीने काम करण्याचे आश्वासन दिल्यानंतरच ग्रामस्थांनी काम सुरू करण्यास परवानगी दिली. या वेळी सचिन घरत, गौतम घरत, कृष्णा घरत, संतोष शिंदे, पिंटू घरत, दादाहरी घरत आदी ग्रामस्थ उपस्थित होते. एकंदरीतच जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुरू झालेल्या या रस्ते दुरुस्तीमुळे विकासापेक्षा भावी लोकप्रतिनिधींचा संधीसाधूपणाच अधिक उघड होत असल्याची चर्चा सध्या गावोगावी रंगू लागली आहे.**









६६ व्या महाराष्ट्र पोलीस स्थापना दिनानिमित्त, बीड पोलीस दलाने शिस्त, धैर्य आणि व्यावसायिकतेचे उत्कृष्ट दर्शन घडवले. श्वान पथकाची प्रात्यक्षिके, शस्त्रांविषयी जनजागृती, वाहतूक शिस्त कार्यक्रम तसेच महिलांच्या सुरक्षिततेसाठी विशेष उपक्रम राबविण्यात आले. या उपक्रमांमुळे विद्यार्थी व नागरिकांना कर्तव्य, त्याग आणि समाजसेवेच्या खऱ्या भावनेची ओळख झाली.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तांबारेवस्ती (साक्षाळ पिंपरी) येथे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी




बीड, (दिव्य न्युज) : बीड तालुक्यातील मौजे साक्षाळ पिंपरी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तांबारेवस्ती येथे क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांची १९५ वी जयंती बालिका दिन म्हणून अति उत्सहात साजरी करण्यात आली. शाळेतील मुलींनी डॉक्टर, वकील, शिक्षीका व कलेक्टर अशा विविध क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांच्या वेषभूषेसह सादरीकरण केले. सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अजिनाथ काशिद हे प्रमुख मान्यवर म्हणुन उपस्थित होते.

तसेच शाळेतील सर्व विद्यार्थ्यांच्या माता पालक मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यामध्ये रंजना काशिद, वर्षा काशिद, ज्योती काशिद, रेखा काशिद ,सोजरबाई तांबारे, प्रिती तांबारे, निर्मला तांबारे, ज्योती तांबारे, समिक्षा क्षीरसागर यांच्यासह पालक वर्ग मोठया प्रमाणात उपस्थित होते. या कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन शाळेच्या शिक्षिका श्रीमती शोभा चव्हाण - काशिद मॅडम यांनी करुण आपले विचार व्यक्त करतांना स्त्री शिक्षणाचे महत्व पटवून दिले. कार्यक्रमासाठी उपस्थित झालेल्या मान्यवरांचे आभार शाळेचे मुख्याध्यापक श्री संपत काशिद सर यांनी मानले.

## दर्पण दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

### अखिल भारतीय तालुका मराठी पत्रकार संघाचा उपक्रम

जिंतूर/ दिव्य न्युज प्रतिनिधी

अखिल भारतीय तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने दर्पण दिनानिमित्त विविध सामाजिक, वैचारिक व आरोग्यविषयक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून हे सर्व कार्यक्रम जिंतूर शहरात उत्साहात संपन्न होणार आहेत. या उपक्रमांची सुरुवात मंगळवार,दिनांक ६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी पत्रकार भवन,जिंतूर येथे होणार असून या वेळी ज्येष्ठ पत्रकारांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास माजी आमदार विजय भांबळे, सुरेश नागरे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. पत्रकारांनी समाजासाठी दिलेल्या योगदानाची दखल घेत त्यांचा गौरव करण्यात येणार आहे. त्यानंतर शनिवार,दिनांक ८ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता जिंतूर येथील जुनी कन्या शाळा, भाजी मंडई येथे प्रा. शेख सुभानअली यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांची राजव्यवस्था व आजचे राजकारण या विषयावर हे व्याख्यान होणार असून या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघनादीदी बोर्डीकर राहणार आहेत. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जिंतूर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष प्रतापराव देशमुख,कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गंगाधरराव बोर्डीकर, सुंदरलाल सावजी बँकेचे अध्यक्ष मुकुंद सावजी कळमकर यांच्यासह विविध सामाजिक,राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तर दिनांक ११जानेवारी २०२६ रोजी ग्रामीण रुग्णालय, जिंतूर येथे पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांसाठी भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये सर्वसाधारण आरोग्य तपासणीसह आवश्यक वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. दर्पण दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या सर्व कार्यक्रमांचा लाभ पत्रकार, त्यांचे कुटुंबीय तसेच नागरिकांनी घ्यावा व मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अखिल भारतीय तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

## यशवंतराव चव्हाण महाविद्यालयमध्ये आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या वतीने दोन दिवशीय कार्यशाळा संपन्न




अंबाजोगाई, (दिव्य न्युज) : यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. दिनांक १ जानेवारी २०२६ रोजी या कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशीच्या सत्रात अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे डॉ. अरविंद घोडके हे होते . या सत्राचे प्रमुख मार्गदर्शक डॉ. गोविंद झाडके,भूगोल विभाग वसुंधरा महाविद्यालय घाटनांदुर हे होते. यांनी स्पर्धा परीक्षा स्वरूप आणि संधी या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या तिसऱ्या सत्रात डॉ. गजानन सवणे हिंदी विभाग वसुंधरा महाविद्यालय घाटनांदुर यांनी भाषा व लेखन कौशल्य या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. व्यक्तिमत्व विकासाच्या अनेक पैलूंपैकी भाषा व लेखन कौशल्य हा महत्त्वाचा पैलू असल्याचे ,शैक्षणिक व व्यावसायिक यश विद्यार्थ्यांसाठी प्रश्न विचारणे, उत्तर मांडणे, सादरीकरण करणे यासाठी ही कौशल्ये अत्यंत आवश्यक आहेत असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागाच्या समन्वयक डॉ. अहिल्या बरुरे यांनी कार्यशाळेच्या आयोजना पाठीमागील उद्देश स्पष्ट करतचांगल्या भाषिक व संभाषण कौशल्यामुळे आपले विचार, भावना व मत स्पष्टपणे मांडता येतात. गैरसमज टाळले जातात आणि संवाद अधिक परिणामकारक होतो. नोकरी, मुलाखत, बैठक, नेतृत्व आणि टीमवर्कमध्येही संभाषण कौशल्य महत्त्वाची भूमिका बजावते म्हणून या कार्यशाळेत अशा विषयांवर समुपदेशन आणि मार्गदर्शन सत्र आयोजित केले आहे असे मत व्यक्त केले. या कार्यशाळेचे मुख्य संयोजक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले तसेच माननीय प्राचार्यांनी कार्यशाळेस शुभेच्छा दिल्या. कार्यशाळेच्या समारोप समारंभास प्रा. राहुल कांबळे यांनी नवीन शिक्षण पद्धती कौशल्य विकास आणि विद्यार्थी केंद्रीय शिक्षण पद्धती या विषयावर मार्गदर्शन केले या समारंभाचे अध्यक्ष डॉ. संजय सुरेवाड हे होते. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रमेश शिंदे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य पी.के जाधव हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.मनोरमा पवार यांनी केले तर आभार प्रा.रोहिणी खंदारे यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.



## महाराष्ट्र राज्य विमुक्त घुंमतू जनजाती महासंघाच्या कार्यकारी प्रदेशाध्यक्षपदी डॉ.लक्ष्मण जाधव यांची निवड

बीड, (दिव्य न्युज) : गेल्या २५ वर्षांपासून लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब,लोकनेत्या ना.पंकजाताई साहेब मुंडे,पदश्री भिकूजी(दादा) ईदाते,मा.दबंग खा.डॉ.प्रीतमताई साहेब मुंडे,भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य सर्जेरावजी तांदळे यांच्या मार्गदर्शनाखाली ओबीसी, भटक्या -विमुक्त जाती जमातीच्या उत्थानासाठी अविरतपणे कार्यरत असलेले डॉ.लक्ष्मण जाधव यांची महाराष्ट्र राज्य विमुक्त घुंमतू जनजाती महासंघाच्या कार्यकारी प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे, याबाबत राष्ट्रीय अध्यक्ष श्री.राजीव कुमार (दिल्ली) यांनी नियुक्ती पत्रक देऊन अभिनंदन करुन पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत. ओबीसी, भटक्या -विमुक्त जाती जमातीच्या अनेक दशकांपासून प्रलंबित प्रश्न जसे की जातिनिहाय जनगणना करण्यात यावी, भटक्या -विमुक्त जाती जमातीच्या उत्थानासाठी पंतप्रधान आवास घरकुल योजना मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करावेत, केंद्र व राज्य शासनाच्या वतीने नेमणूक करण्यात आलेल्या विविध आयोग -समित्या-कमिट्या यांच्या शिफारस लागू करण्यात याव्यात,कैकाडी समाजाचे क्षेत्रबंधन हटवून त्यांना अनुसूचित जाती -जमातीचे आरक्षणात समावेश करावा.

भटक्या -विमुक्त जाती जमातीला अट्रासिटीचे कवचकुंडले प्रदान करण्यात यावीत,क्रीमिलिअरची अट रद्द करावी, भटक्या -विमुक्त जाती जमातीच्या उत्थानासाठी ईदाते आयोग,अग्रवाल आयोग,रेनके आयोग,थाडे समिती,अंत्रोळीकर समिती,मुन्शी समिती यांच्या शिफारशी लागू करण्यात याव्यात यासाठी सदैव शासन-प्रशासन स्तरावर पाठपुरावा सुरू आहे. भटक्या-विमुक्त जाती जमातीच्या भटकंती करणाऱ्यांना जातीचे प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, संजय गांधी निराधार योजना, यशवंत चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजना,श्रावणबाळ योजना, मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना, घरकुल योजना इ.केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून दिलेला आहे.विविध केंद्र व राज्य शासनाच्या लाभदायी योजनांसाठी आवश्यक असलेली प्रमाणपत्र वस्ती,वाडे,पाडे,तांडे, ग्रामीण व शहरी भागात यांचं वास्तव असलेल्या ठिकाणी शासनाने जाऊन शिबीर घेतले असून यासाठी डॉ.लक्ष्मण जाधव हे गेल्या दोन दशकापासून अविरतपणे कार्यरत आहेत. गेल्या अडीच दशकापासून सामाजिक, राजकीय, वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीची दखल घेऊन डॉ.लक्ष्मण जाधव ही निवड करण्यात आली आहे. या निवडी बाबत त्यांची सर्वच क्षेत्रातील अनेकांनी अभिनंदन करुन शुभेच्छा देऊन निवडी बद्दल आनंद व्यक्त केला आहे.

## जि.प.प्रा. उर्दू कन्या शाळेला एस.क्यु.ए.ए.एफ. बाह्य मूल्यमापनात फोअर स्टार रेटिंग





नेकनुर, (दिव्य न्युज) : येथील जिल्हा परिषद प्राथमिक उर्दू कन्या शाळेला एस.क्यु.ए.ए.एफ. (School Quality Assessment and Assuranc Framework) अंतर्गत झालेल्या बाह्य मूल्यांकनात फोअर स्टार रेटिंग प्राप्त झाले आहे. शाळेच्या या यशाबद्दल क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती व स्त्री शक्ती दिनाचे औचित्य साधून शालेय व्यवस्थापन समितीच्या वतीने शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती निसफत बेगम, तसेच या शाळेतील उपक्रमशील जेष्ठ प्रा. पदवीधर तथा कम नेकनूर केंद्राचे केंद्र प्रमुख सय्यद इद्रिस सर व सर्व शिक्षक, शिक्षिका यांचा शाल हार, पुष्पगुच्छ, बुके देऊन शा. व्य. समीतीचे अध्यक्ष सय्यद जबी कादरी, उपाध्यक्ष रऊफ मनियार, सदस्य फहाद कफील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला आहे. या उल्लेखनीय यशामुळे शाळेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा आणि सर्वांगीण विकासाचा गौरव झाला आहे. या मूल्यमापनात शाळेतील अध्यापन पद्धती, विद्यार्थिनींची शैक्षणिक प्रगती, सहशैक्षणिक उपक्रम, स्वच्छता, शालेय व्यवस्थापन, शैक्षणिक वातावरण तसेच पालकांचा सहभाग या विविध निकषांवर सखोल पाहणी करण्यात आली. सर्वच बाबींमध्ये शाळेने उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे तिला उच्च फोअर स्टार रेटिंग देण्यात आले. शाळेच्या मुख्याध्यापिका तसेच सर्व शिक्षकवृंदाच्या सातत्यपूर्ण परिश्रमामुळे हे यश मिळाले आहे. विद्यार्थिनींमध्ये शिक्षणाबरोबरच शिस्त, स्वच्छता व संस्कारांचे महत्व रुजविण्यावर भर देण्यात येत असल्याचे मूल्यमापन पथकाने नमूद केले. या यशाबद्दल शाळेचे शिक्षक, विद्यार्थी, पालक तसेच ग्रामस्थांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सदर कामगिरीमुळे परिसरातील इतर शाळांसाठीही ही शाळा एक आदर्श ठरत आहे.

# ‘राजुरीचे पार्सल’ अन् ‘फितूर सरदार’; क्षीरसागरांसोबत ‘युती’ होईल का?

## बहुमताचा आकडा गाठणे अवघड



### बीड पालिकेत पदग्रहणावेळीच राष्ट्रवादीकडून टीका केल्याने राजकीय समीकरणे गुंतागुंतीची

बीड । दिव्य वार्ता ।

बीड नगरपालिकेत राष्ट्रवादी (अजित पवार) सत्तेत आली असली, तरी बहुमताचा आकडा गाठण्यासाठी त्यांना मोठी कसरत करावी लागणार आहे. पदग्रहण सोहळ्यातच नूतन नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी आमदार संदीप क्षीरसागर आणि डॉ. योगेश क्षीरसागर या दोघांवरही 'राजुरीचे पार्सल' अन् 'फितूर सरदार' असे म्हणत सडकून टीका केली. यावेळी आ. विजयसिंह पंडितही व्यासपीठावर होते. त्यामुळे आता आगामी काळात युतीची 'गणिते' कशी जुळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. बीड पालिकेत एकूण ५२ नगरसेवक आहेत. सत्तेसाठी २७ सदस्यांची गरज आहे. सध्याच्या संख्याबळानुसार राष्ट्रवादी (अजित पवार) कडे १९ सदस्य आहेत. परंतु, पूर्ण वर्चस्वासाठी त्यांना इतरांची साथ हवी आहे. राष्ट्रवादी (अजित पवार) ने शिंदेसेना, काँग्रेस आणि एमआयएमची मदत घेतली तरी बहुमतासाठी दोन सदस्य कमी पडतात. अशा स्थितीत त्यांना भाजप किंवा राष्ट्रवादी (शरद पवार) ची साथ घेणे अपरिहार्य आहे. परंतु, पदग्रहण सोहळ्यातच झालेल्या टोलेबाजीमुळे क्षीरसागर बंधू नाराज झाल्याची चर्चा आहे. अशा परिस्थितीत ते राष्ट्रवादी (अजित पवार) शी हातमिळवणी करतील का? हा मोठा प्रश्न आहे.

### विजयसिंह पंडित यांची सावध भूमिका

नूतन नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी दोन्ही क्षीरसागरांवर टीका केली असली, तरी गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांनी मात्र बोलताना सावध भूमिका घेतली. 'झाले गेले विसरून जाऊन आता नव्या जोमाने एकत्र येऊन काम करू', असे म्हणत त्यांनी युतीचे संकेत दिले आहेत. तसेच गुरुवारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दौऱ्यातही पवारांनी आमदार क्षीरसागर आणि खासदार बजरंग सोनवणे यांच्याशी जवळीक साधली होती. त्यामुळे ही भेटही राजकीयदृष्ट्या महत्त्वाची समजली जात आहे.

### संदीप क्षीरसागर–अजित पवार भेटीने राजकीय हालचालींना आला वेग

राष्ट्रवादी (शरद पवार) चे आमदार संदीप क्षीरसागर यांनी मुंबईत जाऊन उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतल्याने नव्या युतीची नांदी मानली जात आहे. पालिकेचा कारभार चालवण्यासाठी राष्ट्रवादी (अजित पवार) संदीप क्षीरसागरांच्या १२ नगरसेवकांना सोबत घेऊ शकते. मात्र, शिंदेसेनेचे अनिल जगताप यांनी दिलेला 'हवेत राहू नका' हा इशारा पाहता, महायुतीमधील अंतर्गत तणाव वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही

### नाईकवाडेंची टोलेबाजी अन् युतीचा पेच

पदग्रहण सोहळ्यात अमर नाईकवाडे यांनी संदीप क्षीरसागरांचा उल्लेख 'फितूर सरदार' असा केला, तर योगेश क्षीरसागरांना 'राजुरीचे पार्सल' म्हणून हिणवले. 'स्व. विनायक मेटेंचे क्षीरसागरमुक्त बीडचे स्वप्न पूर्ण झाले', असे जाहीर विधान त्यांनी केले. या जहरी टीकेनंतर आता हे दोन्ही गट राष्ट्रवादी (अजित पवार) ला साथ देणार का? आणि जर युती झाली तर नाईकवाडेंनी केलेल्या आरोपांचे काय होणार? हा प्रश्न सध्या राजकीय वर्तुळात चर्चेत आहे.

### क्षीरसागर बंधूही एकत्र येण्याची शक्यता

राष्ट्रवादी (शरद पवार) चे आमदार संदीप क्षीरसागर आणि भाजपचे डॉ. योगेश क्षीरसागर हे देखील पालिकेत युती करण्याची शक्यता नाकारता येत नाही. निकालानंतर काही वेळातच नूतन नगरसेविका डॉ. सारिका क्षीरसागर यांनी तसे संकेत दिले होते. मात्र, अद्याप तरी त्यांच्यात एकही बैठक झाली नसल्याचे सांगण्यात येते. दुसऱ्या बाजूला भाजपकडून राष्ट्रवादी (अजित पवार) ला साथ दिली जाऊ शकते. परंतु, असे झाले तर डॉ. योगेश क्षीरसागर आणि आमदार विजयसिंह पंडित असा अंतर्गत राजकीय 'सामना' पाहायला मिळू शकतो. दोघांनीही प्रचारादरम्यान 'पार्सल', 'गोदाकाठचा वाघ' असे म्हणत एकमेकांना आव्हाने दिली होती.

### .... असे आहे संख्याबळ ५२ एकुण जागा




# परतुर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुदाम भागवत यांची गोवंशीय जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्यांवर कार्यवाही; ३४ लाख ३० हजाराची मुद्देमाल जप्त



परतूर, (दिव्य न्युज) : परतुर पोलीस स्टेशनचे दबंग पोलीस निरीक्षक सुदाम भागवत यांची दबंग कारवाई ३४ लाख ३० हजाराची गोवंशीय जनावरांची अवैधरित्या करणाऱ्या वर दबंग कारवाई करण्यात आली आहे तसेच मिळलेली माहितीनुसार कंटेनर वाहनामधुन वाहतुक करणाऱ्या ०४ आरोपी ताब्यात घेऊन त्यांचेकडुन २६ गोवंशीय बैल व ०१ कंटेनर असा एकूण ३४,३०,०००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करून पोलीस ठाणे परतुर यांनी पान २ वर





बीड येथील बसस्थानक तसेच शहरातील विविध रस्त्यांवर फलक नसलेल्या; परंतु प्रवाशंना घेऊन जाणाऱ्या बस पाहायला मिळाल्या. काही फलक अर्धवट दिसले.

## प्रवासी संभ्रमात!

प्रवाशांना पुरेशी सुविधा देण्यासाठी एसटी महामंडळाकडून प्रयत्न केले जात आहेत. बसस्थानकाच्या स्वच्छतेसह नवीन बसही उपलब्ध केल्या जात आहेत, परंतु अनेक बसच्या फलकावर कोणत्या गावाला जाणार याचे नाव नसल्याने बस कुठे जाणार आहे? हे लक्षात येत नाही. त्यामुळे प्रवासी बुचकळ्यात पडलेले असतात.

# आरोग्यासाठी ‘मशरूम’ ठरतेय वरदान

### बीडमधील महिला उद्योजक प्रदर्शनात ‘अन्नपूर्णा मशरूम’चा ठसा





### महिला उद्योजकतेची नवी भरारी

बीड । दिव्य वार्ता ।

महिलांनी महिलांच्या प्रगतीसाठी उभारलेल्या ‘तेजस्विनी ग्रुप’च्या वतीने रामकृष्ण लॉन्स येथे आयोजित प्रदर्शन व विक्री मेळाव्यात अन्नपूर्णा ऑईस्टर मशरूम फार्मिंग’ केंद्राने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. वरवटी (जि. बीड) येथील उद्योजिका मनीषा सुखवसे (कोटुळे) यांनी या प्रदर्शनात मशरूमचे मानवी आरोग्यासाठी असलेले अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित केले.

मशरूम: आधुनिक काळातील सुपरफूड

प्रदर्शनादरम्यान ग्राहकांना मशरूमच्या औषधी आणि पोषक गुणांची सविस्तर माहिती देण्यात आली. आहारतज्ज्ञांच्या मते, मशरूम हे केवळ एक भाजी नसून ते अनेक आजारांवर पान २ वर

रामकृष्ण लॉन्स येथे पार पडलेल्या या कार्यक्रमात मान्यवरांनी भेट दिली असता, मनीषा सुखवसे यांनी गाळा क्र.१५ वरून मशरूम शेतीतील संधी आणि आरोग्यासाठी त्याचे महत्त्व पटवून दिले. महिलांनी केवळ घरगुती उत्पादनांपुरते मर्यादित न राहता मशरूम सारख्या आधुनिक आणि आरोग्यदायी शेतीकडे वळावे, असा संदेश या प्रदर्शनातून देण्यात आला. यावेळी जिल्हा कृषी अधिक्षक एस म साळवे, व कृषी अधिकारी , कर्मचारी प्रशांत नाळपे तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते आणि त्यांनी मशरूम खरेदीसह त्याच्या पाककृतींचीही माहिती जाणून घेतली.

# ५ जानेवारीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची परभणीत प्रचारसभा

### भाजप जिल्हा शाखेची पूर्वतयारी बैठक सपन्न



परभणी, (दिव्य न्युज) महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर परभणी मनपा निवडणूकीतील भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सोमवारी(दि. ५ जानेवारी ) दुपारी ०२ वाजता परभणी येथील वसमत रस्त्यावरील विष्णू जिनिंग परिसरात प्रचार सभा आयोजित करण्यात आली आहे. या प्रचार पान २ वर

# भाड्याने कपडे देणाऱ्यांकडून स्वच्छतेची ऐशी तैशी; विद्यार्थ्यांना त्वचारोग होण्याचा धोका!

### पालकांनी सावधगिरी,दुकानदारांनी जबाबदारी बाळगावी, शिक्षकांनी लक्ष द्यावे -एस.एम.युसूफ़



बीड (दिव्य न्युज) : भाड्याने कपडे देणाऱ्यांकडून स्वच्छतेची ऐशी तैशी होत असल्याने विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे त्वचारोग होण्याचा धोका निर्माण झाला आहे. यामुळे पालकांनी सावधगिरी,दुकानदारांनी जबाबदारी बाळगावी तर शिक्षकांनी लक्ष द्यावे असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी केले आहे.याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, व्यवसाय मग तो कोणताही असो इमाने-इतबारे केल्यास ग्राहकांना चांगली सेवा मिळते. यामुळे ग्राहकालाही त्रास होत नाही आणि व्यावसायिकाचा व्यवसायही भरभराटीला येतो परंतु कपडे भाड्याने देणारे व्यावसायिक या धोरणाला हरताळ फासत असल्याचे दिसून येत आहे.

शाळा/विद्यालयात घेतल्या जाणाऱ्या विविध कार्यक्रमासाठी वेशभूषा करताना वेगवेगळ्या प्रकारचे कपडे घालण्यासाठी घ्यावे लागतात. पान २ वर

# अल्पवयीन मुलांच्या हाती वाहन देणे पडेल महागात; २५ हजारांचा दंड

बीड । दिव्य वार्ता ।

आपल्या पाल्याने गाडी चालवावी असे प्रत्येक पालकाला वाटत असले तरी, १८ वर्षांखालील मुलांच्या हाती स्टेअरिंग देणे आता पालकांना चांगलेच महागात पडणार आहे. बीड पोलिसांनी यासंदर्भात जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये आणि कोचिंग क्लासेसच्या प्रमुखांना कडक पत्र पाठवले असून पालकांसाठी धोक्याचा इशारा दिला आहे. सर्वांनी काळजी घ्यावी, नियमांचे पालन करावे, असे आवाहन पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी केले आहे.

### ३ वर्षे जेलची हवा, दंडही भरावा लागणार

अल्पवयीन मुलांनी ५० सीसी पेक्षा जास्त क्षमतेचे वाहन चालवल्यास पालकांना किंवा वाहन मालकाला २५ हजार रुपये दंड भरावा लागणार आहे.

एवढेच नाही तर, मोटर वाहन कायद्यानुसार पालकांना ३ वर्षांपर्यंत सश्रम कारावासाच्या शिक्षेची तरतूदही करण्यात आली आहे.

अशा प्रकरणांमध्ये पालकांविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि 'जेजे अॅक्ट' कलम १८ अन्वये गुन्हे दाखल केले जातील.




**५०** सीसीपेक्षा जास्त क्षमतेचे वाहन चालवण्यास बंदी

### भविष्यावर होणार वाईट परिणाम

पोलिसांनी दिलेल्या इशाऱ्यात म्हटले आहे की, जर अल्पवयीन मुलावर गुन्हा दाखल झाला, तर त्याला भविष्यात सरकारी नोकरी, पासपोर्ट आणि चारित्र्य प्रमाणपत्र मिळवण्यात मोठ्या अडचणी येतील. तसेच, संबंधित मुला-मुलीला वयाच्या २५ वर्षांपर्यंत वाहन परवाना दिला जाणार नाही.

### अपघात झाल्यास विमा मिळणार नाही

१. अल्पवयीन मुले वाहन चालवताना अपघात झाल्यास, संबंधित वाहनाचा विमा दावा फेटाळला जातो, ज्यामुळे सर्व आर्थिक भार पालकांवर पडतो.

२. पोलिसांनी पालकांना आवाहन केले आहे की, मुलांना दुचाकी देण्याऐवजी सायकल किंवा ई-सायकलचा पर्याय उपलब्ध करून द्यावा, जो सुरक्षित आणि सोयीस्कर आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०